# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक ०९/०५/२०२४ (गुरूवार) दुपार

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०८/०५/२०२४ रोजी पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ अवैध धंदयांवर रेडकामी पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मौजा वाकोडी येथे ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— राजकुमार अन्नाजी चौधरी वय ३६ वर्ष** हा आपल्या ताब्यातील हीरव्या रंगाचा जॉन डीयर कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/एल—४२३७ सोबत जोडलेल्या ट्रॉली क्र. एम एच—४०/एल—५५८४ ट्रॉलीमध्ये मौंजा वाकोडी शिवारातील कन्हान नदीचे पात्रातील वाळुचा चोरीने उपसा करून ०१ ब्रास वाळु ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरून चोरटी वाहतुक करीत असताना फिर्यादी यांना मिळुन आल्याने आरोपी यांचे ताब्यातुन हीरव्या रंगाचा जॉन डीयर कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच— ४०/एल— ४२३७ किंमती ४,००,०००/— रूपये व सोबत जोडलेल्या ट्रॉली क्र. एम एच— ४०/एल ५५८४ किंमती २,००,०००/— रूपये व एक ब्रास रेती किंमती ५,०००/— रू. व दोन लोखंडी पावडे आणि दोन प्लॅस्टीकचे घमीले किंमती ६००/— रूपये असा एकुण ६,०५,६००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून **आरोपी १) राजकुमार अन्नाजी चौधरी वय ३६ वर्ष २) सचिन भाउरावजी गोंडाणे वय २५ वर्ष, दोन्ही रा. वाकोडी ता. सावनेर** यांचेविरूद्ध कलम ३७९ भा.दं.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये, ४, २१ खान खनिज अधिनियम अन्वये पो. स्टे खापा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे खापा येथील ठाणेदार सपोनि अनिल राऊत पोउपनि सचिन जंगम, सफौ पिकास बेलसरे, पोशि पन्नालाल बटाउवाले यांनी केली.

# अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
# नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०७/०५/२०२४ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ अवैध धंदयांवर रेडकामी पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना सावनेर ते खापा रोडवरील उडाण पुलाचे खाली ट्रकमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— १) धर्मराज हुसेन रंगारी, वय ४१ वर्ष, रा. रामडोंगरी, खापा ता. सावनेर जि. नागपुर** हा **आरोपी क्र. २) प्रज्वल योगेश गोखे वय २० वर्षे रा. गडेवालपुरा खापा, ता. सावनेर जि. नागपुर** याचे सांगणेवरून आपल्या ताब्यातील टाटा हायवा ट्रक क्र. MH-40/AK-8585 मध्ये ०२ ब्रास पेक्षा अतिरीक्त रेती १.८० ब्रास चोरटया रीतीने भरून अवैधरीत्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदर ट्रक मा. तहसीलदार सा. सावनेर यांचे कडून verify करणे साठी पोस्टे ला डीटेन करून ठेवले आरोपी यांचे ताब्यातुन १) टाटा हायवा ट्रक क्र ट्रक क्र. MH-40/AK-8585 किंमती १०,००,०००/— रू. २) अतिरिक्त रेती १.८० ब्रास रेती किंमती १०,८००/—रू. ३) ट्रक चालकचे redmi मोबाईल किंमती ४,०००/—रू. ४) ट्रक मालक चे vivo मोबाईल किंमती ३,०००/— रू असा एकुण किंमती १०,१७,८००/— रु. चा मुद्देमाल जप्त करून आरोपी यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९ भा.दं.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, अन्वये पो. स्टे सावनेर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर मा. श्री. अनिल म्हस्के भा.पो.से. यांचे मार्गदर्शनात रविंद्र मानकर ठाणेदार सावनेर, पो.उप.नि. गेडाम, GPSI कडु पोहवा माणिक शेरे, पो.कॉ. नासीर यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर